**Annual Gathering - *Navasrjana***

# नूतन मराठाच्या नवसृजन संमेलनात विद्यार्थ्यांनी सोडली कौशल्याची छाप



नूतन मराठा महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात विभाग प्रमुखातर्फे बक्षीस देऊन गौरवण्यात आलेले गुणवंत विद्यार्थी.

**प्रतिनिधी** | जळगाव

नूतन मराठा महाविद्यालयात नवसृजन वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच झाले. यात विद्यार्थ्यांनी धम्माल केली.

स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनावेळी कलावंत विनोद ढगे, जिल्हा उपनिबंधक म्हणून निवड झालेल्या भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. स्नेहसंमेलनाला महाराष्ट्र गीताने प्रारंभ झाला. कविता,गजल,गायन, नृत्य असे एकापेक्षा एक सरस बहारदार कला प्रकारातून विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कौशल्याची छाप सोडली. प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महाविद्यालयाचे ग्रंथालय अनेक दर्जेदार ग्रंथांनी युक्त आहे त्याचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन केले. विद्यापीठ आणि महाविद्यालयात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवलेले विद्यार्थी, एनएसएस, एनसीसी आणि क्रीडा विभागात विशेष कामगिरी करणाऱ्या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विभाग प्रमुखांतर्फे बक्षीस देऊन गौरवण्यात आले.